MBMC/MS/IWL/2018/175

# Application for Obtaining Information Under Right to Information Act, 2005

10 रु. कोर्ट फी COURT FEE Rs.10 भारत INDIA दस रुपये TEN RUPEES

21 FEB 2018

स. पु
3124
26/2/18

To,

Public Information Officer,
TOWN Secretary
Mira-Bhaindar Municipal corporation
Head office 3rd floor, Bhaindar

(1) Full Name of the Applicant :- **Mr. Raju Goyal** (Mob : 9821535666)

(2) Address :- Shop No. 4, G-wing, Rashmi Tanmay, Opp. MBMC Commissioner Bungalow, Beverly Park, Mira Road (East) Dist. Thane – 401107

नगरसचिव विभाग
क्र. न.स./ज.प./आ.क.
दिनांक :- 26/2/18
22
2090.95

(3) Particulars of Information required :-

(I) Subject matter of Information :- Agenda of Mahasabha dt 20/2/2016

(II) The period to which the information relates — 20/02/2018 to Disposal of this RTI

(III) Description of the information required — 1) copy of the Notice, Agenda of Maha Sabha dt. 20/02/2016
2) Copy of the Goshwara of subject No. 74
3) copy of the Resolution (Tharav) ~~by~~ on subject No 74 sanctioned by Hon. Mayor by Majority
4) Proceeding and Minutes recorded S.No. 74

(IV) Whether information is required by post or in person — In hand

(V) In case buy post (Ordinary, registered of Speed) — N/A

4 Whether the applicant to below poverty line :- NA

Place : Mira Road

Date 21/02/18

Signature of Applicant
(Raju Goyal)

टिप →

* जर तुम्हाला असे वाटत असले की, वरीलप्रमाणे मागितलेली माहिती तुमच्या विभागाशी संबंधित नसेल तर, माहिती अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 6(3) च्या तरतुदींचे पालन करून 5 दिवसाच्या आत, माझा अर्ज समुचित विभागकडे हस्तांतरित करा.

* महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र. संकिर्ण 2017/प्र.क्र. (208/17) सहा. दिनांक 17/11/2017 प्रमाणे हा अर्ज प्राप्त झाल्यानंतर 10 व्या दिवसपर्यंत शुल्काची रक्कम जलदगती टपाल कळवावे ही नम्र विनंती.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे 401 101
नगरसचिव विभाग

जा.क्र.मनपा/सचिव/मा.अ./22 /2018 दिनांक :- 06/03/2018

प्रति,
श्री. राजू गोयल,
शॉप नं. 4, जी विंग, रश्मी तन्मय,
कमिशनर बंगल्यासमोर, ब्रेवर्ली पार्क,
मिरारोड (पू.)

विषय :- कैंद्र शासनाचा माहितीचा अधिकारी 2005.
मा. महासभा दि. 20/02/2018 रोजीची विषयपत्रिका, गोषवारा व ठरावाची सत्यप्रत मिळणे बाबत.

संदर्भ :- आपणांकडील दि. 21/02/2018 रोजीचा माहिती अधिकारातील अर्ज.

महोदय,

उपरोक्त विषयांकित संदर्भित पत्रान्वये, आपण मा. महासभा दि. 20/02/2018 रोजीची विषयपत्रिका, प्रकरण क्र. 74 चा गोषवारा व ठरावाची सत्यप्रत तसेच प्रकरण क्र. 74 वर महासभेत झालेली चर्चे संबंधीत कागदपत्रांची मागणी केलेली आहे. त्याअनुषंगाने आपणांस मा. विशेष महासभा दि. 20/02/2018 रोजीची विषयपत्रिकेची प्रत, मा. विशेष महासभा दि. 20/02/2018 प्रकरण क्र. 74 चा अहवाल गोषवारा व ठरावाची सत्यप्रत उपलब्ध करुन देत आहोत. (एकुण पाने 07)

सदर माहितीबाबत आपले समाधान न झाल्यास अपिलीय अधिकारी तथा प्र. नगरसचिव श्री. वासुदेव शिरवळकर, नगरसचिव विभाग, तिसरा मजला, मुख्य कार्यालय, स्व. इंदिरा गांधी भवन, भाईंदर (प.) यांचेकडे 30 दिवसात प्रथम अपिल करता येईल.

कळावे.

गोषवारा नाही, अहवाल दिला आहे
3 पेज + 4 पेज Recived
= 7 पेज
8/03/2018

06/03/18

(कैलास दा. म्हात्रे)
जनमाहिती अधिकारी तथा लिपीक
मिरा भाईंदर महानगरपालिका
(भ्रमणध्वनी क्र. 9867077799)

pc 2\\User001\d\Mahiti Adhikar\Letter - Raju Goyal.docx

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

## मा. विशेष महासभा दि. २०/०२/२०१८, सभा सुचना क्र. ०५

### विषयपत्रिका

| प्र.क्र. | विषय |
|---|---|
| 59 | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १२९ (१)(अअ) नुसार "पाणी पुरवठा लाभ कर" लागु करणेस मंजुरी मिळणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. १६/१२/२०१७ प्रकरण क्र. ३१, ठराव क्र.३०) |
| 60 | पाणीपट्टी दरात व नविन जलजोडणी शुल्क व इतर दरात वाढ करणेबाबत. (महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम १५० प्रमाणे) (मा. स्थायी समिती सभा दि. १६/१२/२०१७ प्रकरण क्र. ३३, ठराव क्र. ३१) |
| 61 | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १३१(१)(a)(b) नुसार "मलप्रवाह कर" लागु करणेस मंजुरी मिळणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. ३०/१२/२०१७ प्रकरण क्र. 45, ठराव क्र. 42) |
| 62 | मालमत्ता कर आकारणी करीता भाडे मुल्याचे वाढीव दरास मंजूरी मिळणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. १२/०२/२०१८ (दि. ०३/०२/२०१८ रोजीची तहकुब सभा) प्रकरण क्र. ७५, ठराव क्र. ६५) |
| 63 | घनकचरा व्यवस्थापन नियम 2016 अन्वये प्रत्येक घनकचरा निर्मितीकडून घनकचरा शुल्क लागू करणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. १२/०२/२०१८ (दि. ०३/०२/२०१८ रोजीची तहकुब सभा) प्रकरण क्र. ७८, ठराव क्र. ६८) |
| 64 | भाडेतत्वावर आकारण्यात आलेल्या मालमत्तांच्या कर आकारणी बाबत विचार विनीमय करुन निर्णय घेणे (मा. स्थायी समिती सभा दि.14/02/2018 प्र.क्र. 91, ठराव क्र.78) |
| 65 | पुर्नविनीयोजन पत्रकास मान्यता देणेबाबत. |
| 66 | पुर्नविनियोजन पत्रकास मान्यता देणे. (सार्व. बांधकाम विभाग) |
| 67 | मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील वाहतुक नियंत्रण करणे कामी वाहतुक नियंत्रण शाखेच्या मदतीसाठी ट्राफीक वॉर्डन उपलब्ध करुन देण्याच्या खर्चास मान्यता देणे. |
| 68 | मिरारोड पूर्व व पश्चिम यांना जोडणारा रेल्वेवरील उड्डाण पुल बांधणेबाबत. |
| 69 | जागा भाड्याने देणेबाबत निर्णय घेणे. |
| 70 | लोकशाहिर अण्णाभाऊ साठे नागरी दलितवस्ती सुधारणा योजना अंतर्गत अनुदान प्राप्त होण्यासाठी प्रस्तावित कामास मान्यता देणेबाबत. |
| 71 | भाईंदर (प.), भाईंदर उत्तन रोडवरील सुभाषचंद्र बोस जलकुंभ ते डोंगरी पंपिंग स्टेशन पर्यंत मुख्य (फिडरमेन) 600 मी.मी. व्यासाची मृदु पोलादी जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. |
| 72 | परिवहन समितीवर सदस्यांची नेमणूक करणेबाबत. |
| 73 | महिला व बालकल्याण समितीमार्फत 08 मार्च जागतिक महिला दिनानिमित्त 100 महिलांना रिक्षाकरीता कर्ज उपलब्ध करणेबाबत. |
| 74 | मिरा भाईंदर महानगरपालिका विकास आराखडा बाबत विचार विनीमय करुन निर्णय घेणे. |

(वासुदेव शिरवळकर)
प्र. नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

महानगरपालिका सचिव कार्यालय
मिरा भाईंदर महानगरपालिका
दिनांक :- १४ फेब्रुवारी, २०१८

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. विशेष महासभा दि.20/02/2018

## // अहवाल //

**प्रकरण क्र. (74) :-** <u>मिरा-भाईंदर महानगरपालिका विकास आराखड्याबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.</u>

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष महासभेस विषयाधीन प्रस्तावाचा गोषवारा हा या कार्यालयामार्फत सादर करण्यात आलेली नाही तथापि त्याबाबत या कार्यालयाचा अहवाल हा मा. महासभेपुढे पुढील प्रमाणे सादर करीत आहे.

मिरा-भाईंदर शहराची विकास योजना ही शासन निर्णय क्र.टिपीसए-1296/847/प्र.क्र.162/96/नवि-12, दि.14/05/1997 अन्वये भागशः मंजूर झालेली असून, ती दि.15/07/1997 पासून अंमलात आलेली आहे. तसेच वगळलेल्या भागाची विकास योजना ही शासन निर्णय क्र.टिपीएस-1298/941/प्र.क्र.89-98/नवि-12, दि.25/08/2000 अन्वये मंजूर करणेत आलेली आहे.

मिरा-भाईंदर शहरासाठी उपरोक्त मंजूर विकास योजना सुधारित करणेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 23(1) व 38 अन्वये महानगरपालिकेने मा. महासभा ठराव क्र.76, दि.15/10/2015 अन्वये इरादा जाहीर केलेला असून, महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये दि.26/12/2015 रोजी तसेच दि.19/11/2015 रोजीच्या "परशुराम समाचार" व "फ्री प्रेस जनरल" या वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आलेला आहे.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मा. महासभेचे प्रकरण क्र.132, ठराव क्र.100, दि.18/01/2016 च्या अनुषंगाने मा. सहसंचालक, नगररचना, कोकण विभाग, नवी मुंबई यांनी पत्र क्र.वियो-मिरा भाईंदर मनपा/नर अधिकारी/नेमणूक/सहसंकोवि/320, दि.09/03/2016 पत्रान्वये मान्यता दिल्यानुसार सदरची विकास योजना सुधारित करणेसाठी, त्यासाठी संपूर्ण महानगरपालिका हद्दीतील क्षेत्राचे सर्व्हेक्षण करण्यासह विद्यमान जमिन वापर नकाशा तयार करणे व सुधारित विकास योजनेचे प्रस्ताव इ. कामे पूर्ण करुन महानगरपालिकेकडे सादर करणेकरीता मा. आयुक्त यांचे आदेश क्र.मिभा/मनपा/आयुक्त/358/2015-16 दि.10/03/2016 अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, 1966 चे कलम 24 अन्वये "नगररचना अधिकारी" म्हणून नगररचनाकार यांची नेमणूक करणेत आलेली आहे.

तसेच महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, 1966 चे कलम 25 अन्वये मिरा-भाईंदर शहराचा विद्यमान जमीन वापर नकाशा (ELU) हा नगररचना अधिकारी तथा नगररचनाकार यांनी पत्र क्र. मनपा/नर/1434/2016-17, दि.24/06/2016 अन्वये आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांचेकडे सादर केलेला आहे.

मिरा-भाईंदर शहराची विकास योजना सुधारित करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, 1966 चे कलम 23 खाली इरादा प्रसिध्द झाल्यानंतर, उक्त अधिनियमाच्या कलम 26 अन्वये प्रस्तावित जमीन वापर नकाशा (ELU) हा दोन वर्षात (मुळ मुदत) प्रसिध्द होणे आवश्यक आहे. अन्यथा सदर प्रसिध्दी दिनांकापर्यंत उक्त अधिनियमाच्या कलम 26 प्रमाणे मा. महासभेचा मुदतवाढीचा ठराव घेऊन, शासनाकडे प्रस्ताव मंजूरीसाठी सादर करणे आवश्यक आहे. मूळ मुदतीनंतर जास्तीत जास्त एक वर्षाची मुदतवाढ ही सबळ कारणांअंती अनुज्ञेय होवू शकेल.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. विशेष महासभा सभा दि. २०/०२/२०१८

**प्रकरण क्र. ७४ :-** **मिरा भाईंदर महानगरपालिका विकास आराखडा बाबत विचार विनीमय करुन निर्णय घेणे.**

**ठराव क्र.** ७२ **:-**

मिरा भाईंदर शहराची विकास योजना वगळलेला भाग सोडून दि.१४/०५/१९९७ रोजी मंजुर होऊन दि,१५/०७/१९९७ पासून अमंलात आलेली आहे. तसेच वगळलेला भागाची विकास योजना दि.२५/०८/२००० रोजी मंजूर झालेली आहे. मंजुर विकास योजनेस २० वर्षे पूर्ण होत आल्यामुळे सदर विकास योजना सुधारित करणेसाठी मा.महासभा ठराव क्र.७६, दि.१५/१०/२०१५ अन्वये इरादा जाहिर केलेला असून सदरकामी शासनाकडील नगररचनाकार श्री.दिलीप घेवारे हे शासकीय अधिकारी असल्यामुळे शासनाच्या मंजुरीने त्यांची नगररचना अधिकारी म्हणून व्यक्तीशः नेमणूक करणेत आलेली आहे.

त्याप्रमाणे श्री.दिलीप घेवारे यांनी विद्यमान भूवापर (E.L.U.) दि.२५/०६/२०१६ रोजी मा.आयुक्त यांचेकडे सादर केलेला आहे.त्यानंतर श्री. दिलीप घेवारे, नगररचना अधिकारी यांनी प्रारुप सुधारीत विकास योजना दि.०७/०२/२०१८ रोजी सिलबंद लखोट्यामध्ये आयुक्त यांचेकडे सादर केलेली असून सदर बाबतीत आयुक्त यांनी सहा-संचालक नगररचना यांचेकडे मार्गदर्शन मिळणेस दि.१४/०२/२०१८ रोजी पत्र दिलेले आहे.

परंतू श्री.दिलीप घेवारे हे शासनाकडील अधिकारी असल्यामुळे व शासनाच्या मान्यतेने त्यांची नगररचना अधिकारी म्हणून नेमणूक केलेली असल्यामुळे त्यांनी सादर केलेला प्रारुप सुधारीत विकास आराखडा पुढच्या मा.महासभेत आयुक्त यांनी सविस्तर माहितीसह सादर करावा व विकास योजनाच्या भाग नकाशा स्थानिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करुन बातमी केलेली असल्यामुळे याबाबत आयुक्त यांनी सविस्तर चौकशी करुन सदर भाग नकाशा विकास योजनेचा भाग असल्यास संबधित जबाबदार व्यक्तीवर कार्यवाही करावी व सदर बातमी खोटी असल्याचे निर्दशनास आल्यास खोटी बातमी प्रसिध्द करणा-या विरोधात कठोर कार्यवाही करुन गुन्हा दाखल करणेत यावा.

तसेच मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर सहाय्यक नगररचनाकारांची दोन पदे मंजूर असून त्यापैकी एका पदावर मनपाच्या आस्थापनेवरील अभियंतामधून श्री. भरत जगताप यांची नेमणूक करणेत आलेली होती. त्यानंतर या दोन पदापैकी एक पद पदोन्नती करुन नगररचनाकार यांची नेमणूक करुन उर्वरित सहाय्यक नगररचनाकार या पदावर नेमणूक झालेल्या श्री.पटेल यांना मनपाच्या अभियंत्याच्या अनुभवाचा व त्यांच्या सेवेचा विचार करुन मनपाने हजर करुन घेतलेले नव्हते व सदर रिक्त पदावर श्री. पांगळ यांना प्रभारी कार्यभार सोपविण्यांत आलेला होता.

मनपासाठीच्या मंजूर सेवा भर्ती नियमावलीमध्ये सहाय्यक नगररचनाकार यांची दोन्ही पदे शासनामार्फत प्रतिनियुक्तीने भरणेबाबत तरतूद मंजुर आहे. तथापि शासनाकडील सहाय्यक संचालक हे मुख्य पद मंजुर असल्यामुळे मनपाच्या आस्थापनेवरील अभियंत्याची कुंठीता घालविण्याच्या दृष्टीकोनातून व त्यांचा अनुभव लक्षात घेता सदर सहाय्यक नगररचनाकारांची दोन्ही पदे मनपाच्या आस्थापनेवरील अभियंतामधून पदोन्नतीने भरणेत यावीत व याबाबत कार्योत्तर मंजुरी मिळणेसाठी प्रस्ताव आयुक्त यांनी शासनास सादर करावा. तसेच सध्या शासनाकडील प्रतिनियुक्तीवर आलेले सहाय्यक नगररचनाकार यांना त्वरीत कार्यमुक्त करुन शासनाकडे परत पाठवावे असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. मदन उदितनारायण सिंह** **अनुमोदन :- श्री. रवि व्यास**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | भोईर सुनिता शशिकांत | १ | कदम अर्चना अरुण | १. जैन गीता भरत |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | शाह रिटा सुभाष | २ | गुप्ता कुसुम संतोष | |
| ३ | तिवारी अशोक सुर्यदेव | [illegible] | परेरा कॅटलीन एन्थोनी | |
| ४ | पांडेय पंकज सूर्यमणि | ४ | पाटील नरेश तुकाराम | |
| ५ | पाटील रोहिदास शंकर | ५ | सय्यद नुरजाहाँ नाझर हुसेन | |
| ६ | गोहिल शानू जोरावर सिंह | ६ | पाटील जयंतीलाल गुरूनाथ | |
| ७ | कांगणे मीना यशवंत | ७ | घरत तारा विनायक | |
| ८ | सिंह मदन उदितनारायण | ८ | पांडे स्नेहा शैलेश | |
| ९ | शेट्टी गणेश गोपाळ | ९ | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | |
| १० | भोईर गणेश गजानन | १० | शिर्के अनंत गेणू | |
| ११ | पाटील प्रभात प्रकाश | ११ | पाटील संध्या प्रफुल्ल | |
| १२ | पाटील वंदना मंगेश | १२ | पाटील प्रविण मोरेश्वर | |
| १३ | रावल मेघना दिपक | १३ | पाटील अनिता जयवंत | |
| १४ | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | १४ | भोईर भावना राजू | |
| १५ | पाटील धृवकिशोर मन्साराम | १५ | भोईर राजू यशवंत | |
| १६ | जैन सुनिता रमेश | १६ | डिसा मर्लिन मर्विन | |
| १७ | जैन राजेंद्र भवरलाल | १७ | सावंत अनिल दिवाकर | |
| १८ | भुप्ताणी रक्षा सतिश (शाह) | १८ | मेहरा राजीव ओमप्रकाश | |
| १९ | मोकाशी दिपाली आनंदराव | १९ | सपार उमा विश्वनाथ | |
| २० | व्यास रवि वासुदेव | २० | अहमद साराह अकरम | |
| २१ | रकवी वैशाली गजेंद्र | २१ | इनामदार जुबेर अब्दुल्ला | |
| २२ | अग्रवाल सुशील गोपीकिशन | २२ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम | |
| २३ | खंडेलवाल सुरेश जगदीश | [illegible] | गोविंद हेलन जॉर्जी | |
| २४ | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | [illegible] | बगाजी शर्मिला विन्सन्ट | |
| २५ | मेहता डिंपल विनोद | २५ | बांड्या एलायस दुमिंग | |
| २६ | गेहलोत हसमुख मोहनलाल | | | |
| २७ | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | | | |
| २८ | थेराडे संजय अनंत | | | |
| २९ | मुखर्जी अनिता बबलू | | | |
| ३० | वैती चंद्रकांत सिताराम | | | |
| ३१ | हसनाळे ज्योत्स्ना जालींदर | | | |
| ३२ | म्हात्रे सचिन केसरीनाथ | | | |
| ३३ | यादव मिरादेवी रामलाल | | | |
| ३४ | म्हात्रे मोहन गोपाळ | | | |
| ३५ | सोनार सुरेखा प्रकाश | | | |
| ३६ | भोईर विणा सुर्यकांत | | | |
| ३७ | मांजरेकर आनंद दत्ताराम | | | |
| ३८ | अरोरा दिपीका पंकज | | | |
| ३९ | बेलानी हेमा राजेश | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४० | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | | |
| ४१ | गजरे दौलत तुकाराम | | | |
| ४२ | नाईक विविता विवेक | | | |
| ४३ | सोंस निला बर्नाड | | | |
| ४४ | राय विजयकुमार सिस्थन नारायण | | | |
| ४५ | परमार हेतल रतिलाल | | | |
| ४६ | कासोदारीया अश्विन शामजीभाई | | | |
| ४७ | जैन दिनेश तेजराज | | | |
| ४८ | भावसार वंदना संजय | | | |
| ४९ | शाह सीमाबेन कमलेश | | | |
| ५० | विराणी अनिल रावजीभाई | | | |
| ५१ | भोईर जयेश भानुदास | | | |
| ५२ | म्हात्रे नयना गजानन | | | |
| ५३ | भानुशाली वर्षा गिरधर | | | |
| ५४ | म्हात्रे विनोद काशिनाथ | | | |

ठराव बहुमताने मंजूर

Dmehta

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

M.A.C. Form No.2

See Rule 12, 110 (2) 114 116. (2) and 117. (1) (2) & (3)

नमुना नं. २

# मिरा - भाईंदर महानगरपालिका

## सर्वसाधारण पावती

पा. No. 855243 मा. महासभा दि. 20/12/2016

पु. क्र. 5853 8553

श्री. [illegible] यांच्याकडून [illegible] बद्दल

९८/- रुपये (अक्षरी रु. [illegible]) मिळाले

दिनांक ०७/०३/२०१८

लिपीकाची सही

प्राधिकृत अधिकाऱ्याची सही

रोकड वहीत नोंद केली.

पृष्ठ क्रमांक

लेखापाल / रोखपाल

जा.क्र. मभपा / सचिव / मा. 37/22/2018